International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# महाराष्ट्रातील सहकारी बँकांचा संक्षिप्त आढावा

**प्रा. डी. के. भेरे[1] प्रा. बसवराज सी. पाटील[२]**
कर्मवीर पूजा बाबा गोवर्धने, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी, जिल्हा नाशिक
*Corresponding Author- प्रा. डी. के. भेरे*

**प्रस्तावना:**

सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था म्हणजेच सहकारी पतपुरवठा संस्था होय. ज्या गावात किंवा खेड्यामध्ये सहकारी पतसंस्था स्थापन केली जाते,ते गांव किंवा खेड्यापुरते त्या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. त्या गावातील शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक इत्यादी त्या संस्थेचे सभासद असतात. सभासदांना बचतीची सवय लावतात. शेतकरी सभासदांना कमीत कमी व्याजदराने वेळेवर कर्जपुरवठा करतात. कृषिक्षेत्राचा, शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील असतात. सहकारी पतपुरवठा संस्था प्राथमिक पातळीवर सभासदांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार कर्जपुरवठा करतात, संस्थांचा कर्जव्यवहार प्रत्यक्ष सभासदांशी होतो, म्हणून त्यांना प्राथमिक सहकारी पतसंस्था असे म्हणतात. सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण व शहरी भागात कार्य करतात.

**सहकारी पतपुरवठा संस्था व्याख्या:**

१) "संपत्तीचा किंवा आर्थिक स्थितीचा आधार न घेता आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंजवळील उपलब्ध तारण स्वीकारून आणि त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय." - हेंरी वुल्फ

शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज देण्याबरोबरच शेती उपयुक्त वस्तू, विविध सेवा, जीवनावश्यक वस्तू पुरविणे व शेतमालाचे पणन करणे इत्यादी क्रिया करण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय."

**सहकारी पतपुरवठा संस्था अर्थ:**

सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था म्हणजेच सहकारी पतपुरवठा संस्था होय ज्या गावात किंवा खेड्यामध्ये सहकारी पतसंस्था स्थापन केली जाते,ते गांव किंवा खेड्यापुरते त्या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. त्या गावातील शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक इत्यादी त्या संस्थेचे सभासद असतात. सभासदांना बचतीची सवय लावतात. शेतकरी सभासदांना कमीत कमी व्याजदराने वेळेवर कर्जपुरवठा करतात. कृषिक्षेत्राचा, शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील असतात. सहकारी पतपुरवठा संस्था प्राथमिक पातळीवर सभासदांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार कर्जपुरवठा करतात, संस्थांचा कर्जव्यवहार प्रत्यक्ष सभासदांशी होतो, म्हणून त्यांना प्राथमिक सहकारी पतसंस्था असे म्हणतात. सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण व शहरी भागात कार्य करतात.

व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांना व्यापारी बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, नागरी सहकारी पतसंस्था कर्ज पुरवठा करतात. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कारागीर, लहान व्यावसायिक व इतर दुर्बल घटकांना

कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी बँका कार्य करतात. सावकारांकडून केले जाणारे आर्थिक शोषण, फसवणूक यापासून मुक्तता करण्याच्या हेतूने सहकारी पतपुरवठा संस्थाची स्थापना केली जाते.

**सेवा सहकारी संस्था :**

शेतकऱ्यांच्या आर्थिक व जीवनावश्यक गरजा भागविणे आणि शेती उत्पादन वाढविणे यासाठी विविध सेवा पुरविणाऱ्या संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय. सेवा सहकारी संस्थांना विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, शेतकरी सेवा सहकारी संस्था किंवा प्राथमिक सेवा सहकारी संस्था असेही म्हणतात. या संस्था सभासदांना फक्त कर्जपुरवठा न करता विविध सेवासुद्धा उपलब्ध करून देतात. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक विविध प्रकारच्या गरजा असतात. उदा. शेतीला कर्जपुरवठा उपलब्ध होणे, सुधारीत बी बियाणे, खते, कीटकनाशके यांची सोय होणे त्याचबरोबर जीवनावश्यक अनेक वस्तूंचीही गरज असते. उदा. किराणा माल, कपडे, साखर, गहू, तांदूळ इ. शेतीविषयक आणि जीवनावश्यक गरजा भागविण्याच्या उद्देशाने ग्रामीण पातळीवर सहकारी तत्त्वावर या संस्था स्थापन झालेल्या आहेत त्यांना सेवा सहकारी संस्था असे म्हणतात. भारतात सेवा सहकारी संस्थांची वाटचाल सन १९५८ पासून सुरू झाली. सेवा सहकारी संस्थांचा विकास प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्था ते बहुउद्देशीय संस्था, बहुउद्देशीय संस्था ते मोठ्या आकाराच्या संस्था, मोठ्या आकाराच्या संस्था ते सेवा सहकारी संस्था या टप्प्यातून झालेला दिसून येतो

**सहकारी पतपुरवठा संस्था अर्थ:**

सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था म्हणजेच सहकारी पतपुरवठा संस्था होय.

**सेवा सहकारी संस्था :**

शेतकऱ्यांच्या आर्थिक व जीवनावश्यक गरजा भागविणे आणि शेती उत्पादन वाढविणे यासाठी विविध सेवा पुरविणाऱ्या संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय. 31 मार्च 2010 रोजी महाराष्ट्रात 21,392 प्राथमिक कृषि सह.पतसंस्था होत्या आणि त्यांची सभासद संख्या 149 लाख होती. प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था सहकारी त्रि-स्तरीय रचनेच्या सगळयात खालच्या स्तरावर ग्रामीण भागात कार्य करतात.गावातील 10 किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन या सहकारी पतसंस्थेची स्थापना करू शकतात. गरीब शेतकऱ्यांनाही संस्थेला सभासद होता यावे यासाठी सदस्यत्व शुल्क/प्रवेश शुक्ल नाममात्र ठेवले जाते.तसेच या संस्था अमर्यादित जबाबदारीच्या तत्वावर (Unlimited liability) स्थापना केल्या जातात. म्हणजेच, ती संस्था अपयशी ठरल्यास तिची देणी (Liabilities) देण्याची पूर्ण जबाबदारी सदस्यांवर असते.

भारतातील पहिली नागरी सहकारी बँक ही 5 फेब्रुवारी 1889 मध्ये मुंबई प्रांतातील बडोदा या शहरात श्री विठ्ठल लक्ष्मण कवठेकर तथा भाऊसाहेब कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झाली. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही महाराष्ट्रातील सहकारी कर्ज पुरवठा यंत्रणेतील शिखर बँक आहे. भारतात सहकारी चळवळीचे पाळेमुळे 1904 मध्ये सापडतात, जेव्हा पहीला सहकारी पतसंस्था कायदा लागू करण्यात आला. सहकारी चळवळीच्या अनुषंगाने विचार करता, महाराष्ट्र हे देशातील सर्वात विकसित राज्य आहे. महाराष्ट्रात क्वचित एखादे खेडेगाव असेल ज्याच्या सहकारी क्षेत्रात समावेश नाही.

महाराष्ट्रमध्ये सहकारी चळवळीचा विकास त्रिस्तरीय रचनेमध्ये झालेला आहे. ज्याच्या अग्रभागी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक शिखर बँक माध्यम स्तरावर जिल्हा बँक व तळाशी प्राथमिक कृषी पतसंस्था कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक राज्यातील

अतिरिक्त संसाधनांचा समतोल केंद्र म्हणून कार्यरत आहे ज्याद्वारे ती बहुआयामी विकास व समृद्धी ची खात्री देते महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही देशातील सर्वात मोठी राज्य सहकारी बँक आहे. सहकारी तत्त्व अनुसरून लोकशाही मार्गाने समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तन तून सहकारी सामायिक संपत्तीचे निर्माण करणे व त्यास प्रोत्साहन देणे हे दुहेरी उद्देश राज्य सहकारी बँक पार पाडत आहे. आजपर्यंतच्या वाटचालीत राज्य सहकारी बँकेचे विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व मान्यवर व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले त्यापैकी यशस्वी उद्योजक दिवंगत श्री लल्लुभाई सामळ दास श्री वैकुंठभाई मेहता, श्री व्ही डी ठाकरसी, प्रतिभावंत प्रोफेसर श्री डी जी कर्वे, डॉ. धनंजयराव गाडगीळ श्री आर जी सरया यांनी बँकेच्या प्रगतीचा आलेख व नावलौकिक वेगळयाच उंचीवर पोहोचविला आहे. पतपुरवठा रचनेत झालेल्या त्रिस्तरीय(PACS, DCCBs, MSCB) पतपुरवठा रचनेमुळे बँकेने आपला कर्जपुरवठा व्यवसाय नव्याने स्थापन झालेल्या मध्यवर्ती बँकेकडे हस्तांतरित केला. ज्यामुळे सहकारी क्षेत्रात कर्ज पतपुरवठा व विपणन यांच्या दुवा साधला गेला. सहकारी क्षेत्रातील उपक्रमांची व्याप्ती वाढविण्यासाठी बँकेने नवीन सहकारी उपक्रमांना मोठ्या प्रमाणात मदत सहाय्यक तर केलेच शिवाय त्यांना तांत्रिक आणि व्यवस्थापकीय तंत्राचे मार्गदर्शन उपलब्ध केले.

अहमदनगर जिल्ह्यातील प्रवारानगर येथील देशातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारताना बँकेचा सिंहाचा वाटा राहिला आहे. बँकेने आपले कार्य मोठ्या प्रमाणावर वाढविण्यासाठी सहकारी औद्योगिक विभाग निर्माण केला व त्यामध्ये विद्यापीठ तंत्र शिक्षण संस्था औद्योगिक हाऊसेस व सल्लागार समिती संस्थांमधील तज्ञ व्यक्तींचा समावेश केला.

अशाप्रकारे बँकेने सहकारी क्षेत्राला सहाय्यभूत उद्योगास शेतीसाठी लागणारे साहित्यनिर्मितीसाठी उदाहरणार्थ खते व यंत्रसामुग्री इंडियन ऑइल पंप सेट्स ट्रॅक्टर्स इत्यादी तसेच बँकेने दुय्यम आणि तृतीय उद्योगांना उभारणीस सहाय्य केले ज्यामध्ये कागद उद्योग मध्यम उद्योग अलीकडील काळातील इथेनॉल निर्मितीचा इत्यादींचा समावेश आहे.

बँकेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, राज्य बँकेने काही मध्यवर्ती जिल्हा बँक यांच्या सहाय्याने शेतीकर्ज योजनेची सुरुवात केली या योजनेच्या यशामुळे सर्वत्र याविषयी कुतूहल निर्माण झाले व त्यामुळे इतर जिल्हा बँकांनी सुद्धा स्वीकार करून योजना देशभरात राबवली. अशा पद्धतीने वेळेच्या कसोटीवर खऱ्या अर्थाने उतरलेली शेती कर्ज योजनेची बँक आद्य प्रवर्तक ठरली.

महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या एकूण 36 जिल्हे असले तरीही मध्यवर्ती सहकारी बँका मात्र 31 आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वित्तीय समावेशन घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाची सहकारी संस्था ठरतात. आर्थिक व वित्तीय सुविधा ग्रामीण भागातील तळागाळात पोचवणे म्हणजे वित्तीय समावेशन होय. महाराष्ट्र राज्याच्या राज्य सहकारी बँकेची स्थापना स्वातंत्र्य पूर्वीच्या 11 ऑक्टोंबर 1891 मध्ये झालेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आपल्या चार प्रादेशिक कार्यालयाच्या माध्यमातून कार्यकर्ते ही प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद, नाशिक, पुणे व नागपूर या ठिकाणी आहेत. प्रत्येक जिल्हा मध्यवर्ती बँकेचा एकेक प्रतिनिधी संचालक मंडळावर असतो. याशिवाय व्यक्ती भागधारक प्रक्रिया संस्था, सहकारी साखर कारखाने, विपणन सहकारी संघ, नागरी सहकारी बँका, कामगार वर्ग, महाराष्ट्र राज्य भू विकास बँक, औद्योगिक बँक आणि महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी संचालक मंडळावर असतात. महाराष्ट्रातला ग्रामीण भागातील सहकारी बँका या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. सातबाराच्या एका कागदावर सभासदांना शेतकऱ्यांना सहकारी बँकेत एका वर्षासाठी शून्य टक्के दराने पिक कर्ज व शेती पूरक व्यवसाय कर्ज मिळते. राष्ट्रीयकृत बँकांनी सारखे सहकारी बँकेत

शेतकऱ्यांना, ना पायलीचे पन्नास कागद कागद जोडावे लागतात ना शेतकऱ्यांना स्वतःची आर्थिक पत मोजून सांगावे लागते. त्यामुळे आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची चाके या सहकारी बँका आहेत. महाराष्ट्रात मार्च 2010 अखेर एकतीस जिल्हा मध्यवर्ती बँका होत्या. त्यांचे सभासद एक लाख 48 हजार 360 इतके होते तर ठेवी 44 हजार 278 कोटी रुपये इतक्या होत्या.